




Title Code- MAHMAR-51647

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!






संपादक : जितेंद्र कायस्थ

Mob- 9822720784

Email- jansanchlan@gmail.com

वर्ष ३ रे | अंक : २६६ वा | बुधवार दि. २५ डिसेंबर २०२४ | पृष्ठ ८ | किंमत ३रुपये


# तर माझा पक्ष आपल्यासोबत खांद्याला खांदा लावून उभा राहील, मुख्यमंत्र्यांना पत्र लिहित ठाकरे पुत्राने टाकला बॉम्ब

**वृत्तसंस्था/मुंबई**

राजकारणात सर्वाधिक काळ युती राहिलीय ती शिवसेना-भाजपची. आता शिवसे-नेतील फुटीमुळे राजकीय समीकरण बदलले असले तरी भाजपची एका गटाशी युती मात्र कायम आहे. यातच ठाकरे पुत्राने गंभीर मुद्द्याची नस पकडत पुन्हा भाजपशी पुन्हा सलगी करण्याचे संकेत दिले आहेत. त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांना पत्र लिहत गंभीर मुद्द्याकडे लक्ष वेधले आहे. आमदार आदित्य ठाकरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांना महाकाय होर्डिंग्स आणि बॅनर्सबाबत एक पत्र लिहिले आहे. या पत्रात त्यांनी देवेंद्र फडणवीसांना एक आव-हान केले आहे. राज्यातील वाढत्या पोस्टर, बॅनर- होर्डिंग्च्या मुद्द्याची नस पकडत त्यांनी याबद्दल नाराजी व्यक्त केली आहे. तर यावर बंदी घालण्याबाबत त्यांनी पत्राच्या माध्यमातून मुख्यमंत्र्यांना आवाहन केले आहे. आदित्य ठाकरेंनी पत्रात २०२५ मध्ये पदार्पण करताना तसेत लोकसेवेचा संकल्प करताना, पक्षीय भेदभाव आणि विचारसरणी बाजूला ठेवून नागरिकांना दिलासा देण्यासाठी राजकीय पोस्टर, बॅनर्स आणि होर्डिंगजबाबत प्रतिबंध घालून आपण सगळ्यात महत्वाचा निर्णय घेऊ शकता, असे मुख्यमंत्र्यांना आवाहन केले आहे. ठाकरे पुढे लिहितात, एक नागरिक म्हणून हे पाहून खेद वाटतो आणि एक व्यक्ती म्हणून शहर विद्रुप करणाऱ्या अशा पोस्टर्सचा सर्वांनाच त्रास होतो आहे. गेल्या दोन वर्षांत बीएमसीकडून निवडक पोस्टर हटवण्यात आली, तर सत्ताधारी पक्षांची पोस्टर मात्र तशीच दिसत आहेत. मी आपल्याला विनंती करतो की, या दिशेने आपण पहिले



पाऊल टाकल्यास आम्ही तुमच्या पाठीशी आहोत. आम्ही विरोधी पक्षात असलो तरी या गोष्टींवर आपण एकत्र काम केले पाहिजे. आपण याविषयी बैठक बोल-ावली किंवा सर्व पक्षांना पत्र लिहिले, तर मी आणि माझा पक्ष आपल्यासोबत खांद्याला खांदा लावून उभा राहील, असे मोठे विधान आदित्य ठाकरेंनी केले आहे.

## अनुसूचित जाती-जमाती आयोगाचे अध्यक्ष तथा आनंदराव अडसूळ शुक्रवारी बुलढाणा जिल्ह्याच्या दौऱ्यावर..



**जनसंचलन/बुलढाणा**

अनुसूचित जाती-जमाती आयोगाचे अध्यक्ष आनंदराव अडसूळ शुक्रवार, दि.२७ डिसेंबर २०२४ रोजी बुलढाणा जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत असून त्यांचा दौरा कार्यक्रम हा पुढीलप्रमाणे रा-हणार आहे. शुक्रवार, दि. २७ डिसेंबर २०२४ रोजी दुपारी ४ वाजता जालन्याहून अमरावती येथे आगमन व सर्किट हाऊसकडे प्रयाण. दुपारी ४.३० वाजता सर्किट हाऊस बुलढाणा येथे सहाय्यक आयुक्त समाज कल्याण विभाग बुलढाणा यांच्या सोबत सामाजिक न्याय विभागाच्या विविध योजनेबाबत आढावा व चर्चा. रात्री बुलढाणा (मलकापूर ) येथून अमरावती एक्सप्रेसने मुंबईकडे प्रयाण करतील.




## स्त्रीशक्तीचा झेंडा रोवणारी पौर्णिमा बॉडी बिल्डिंगच्या जगात ठसा!

**जनसंचलन/बुलढाणा**




मुंबई येथे पार पडलेल्या आंतरराष्ट्रीय महिला बॉडी बिल्डिंग स्पर्धेत बुलढाण्याची कन्या पौर्णिमा सोनुने हिने अभूतपूर्व यश मिळवत चौथा क्रमांक पटकावला आहे. ऑलम्पिया २०२४ स्पर्धेत पौर्णिमाने आपले कौशल्य आणि मेहनतीच्या बळावर बुलढाण्याचे नाव जागतिक पातळीवर उंचावले आहे. अत्यंत खडतर मेहनत, आत्मविश्वास आणि जिद्द याच्या जोरावर पौर्णिमाने हा मानाचा तुरा स्वतःच्या शिरावर रोवला आहे. विविध देशांतील प्रतिभावंत खेळाडूंमध्ये आपल्या देहबांध्याच्या पराक्रमाने तिने आ-पली चमक दाखवली. तिच्या या विजयामुळे विदर्भातील क्रीडा क्षेत्रात नवचैतन्य निर्माण झाले असून, तिचे सर्वत्र अभिनंदन होत आहे. पौर्णिमा सोनुने ही नेहमीच अपार मेहनतीसाठी ओळखली जाते. तिच्या विजयानंतर बुलडाणा शहरात जल्लोषाचा माहोल आहे. यशाच्या या शिखरावर पोहोचण्यासाठी तिने घेतलेले कष्ट आणि तिच्या झुंजार प्रवासाने तरुणांसमोर एक आदर्श निर्माण केला आहे. स्पर्धेतील हा ऐतिहासिक विजय विदर्भासाठी अभिमानास्पद असून, पौर्णिमाच्या यशाचे सूर प्रत्येकाच्या ओठांवर आहेत.दैनिक जनसंचलन बुलडाणा व समस्त बुलढाणेकरांकडून कडून पौर्णिमा तुला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा!

# गाडीच्या इंजिन मध्ये पाणी टाकणे बेतले जीवावर...

**जनसंचलन/बुलढाणा**

मृत्यू कुणाला कसे आणि कसे गाठेल हे कुणीच सांगू शकत नाही. जळगाव जामोद येथील एका युवकाच्या बाबतीत नेमके असेच घडले. शैक्षणिक सहलीसाठी गेलेला युवक बसचे इंजिन गरम झाल्याने त्यात पाणी टाकण्यासाठी उतरलेल्या युवकाला विरुद्ध दिशेने येणाऱ्या चारचाकी वाहनाने (कार ने) धडक दिल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला. बुलढाणा जिल्ह्यातील मोताळा नजीकच्या महावितरणच्या विद्युत उप केंद्राजवळ आज सोमवारी उत्तररात्री अडीच वाजताच्या सुमारास ही हृदय द्रावक दुर्घटना घडली असून सहकाऱ्यांच्या डोळ्यादेखत त्या युवकाचा जीव गेला आहे. शैक्षणिक सहलीतून परतणाऱ्या विद्यार्थ्यांची उभी स्कूल बसला एका भरधाव वेगात आलेली कारने जोरदार धडक दिली, या धडकेत बस समोर उभा राहून इंजिनमध्ये पाणी टाकत असलेल्या ३४ वर्षीय तरुणाला जोरदार मार लागल्याने त्याचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना मोताळा-नांदुरा मार्गावरील मोताळा येथील विद्युत सबस्टेशन जवळ २३ डिसेंबरच्या रात्री २ वाजेच्या सुमारास घडली आहे. प्राप्त माहितीनुसार जळगाव जामोद येथील लईक देशमुख यांचा शिकवणी वर्ग आहे. काल रविवारी, २२ डिसेंबर रोजी सकाळी ते शिकवणी वर्गातील विद्यार्थ्यांची शैक्षणिक सहल घेऊन छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) येथे गेले होते.त्यांनी आपल्या सोबत खाजगी संस्थेत लिपिक असलेला आपला मित्र मोहम्मद मुसअब अब्दुल जाबीर (वय ३२ वर्ष, राहणार जळगाव जामोद ,जिल्हा बुलढाणा) यालाही घेतले. रविवारी, २२ तारखेला रात्री उशिरा जळगाव जामोदकडे परत ते परतत होते. दरम्यान स्कूल बसचे इंजीन गरम झाले. यामुळे बस चालकाने नांदुरा मार्गावरील मोताळा जवळच्या विद्युत उप केंद्रा जवळ बस थांबवली. चालकाने बस रस्त्याच्या खाली डाव्या बाजूला थांबविली. यावेळी मोहम्मद मुसअब खाली उतरुन इंजिन मध्ये पाणी



टाकत असताना समोरून भरधाव वेगात आलेल्या कारने स्कूल बसला जोरदार धडक दिली.यात मोहम्मद मुसअब याला जोरदार मार लागला. त्याला तात्काळ बुलडाणा येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात नेण्यात आले. मात्र कार्यरत डॉक्टरांनी त्याला मृत्यू घोषित केले. या प्रकरणी बोराखेडी पोलीस ठाण्यात आरोपी कार चालक अखिलेश विजय चौधरी( राहणार नांदुरा, जिल्हा बुलढाणा) याच्याविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेची माहिती जळगाव जामोद येथे येऊन धडकताच एकच खळबळ उडाली. मृत मोहम्मद मुसअब यांच्या परिवारावर दु:खाचा डोंगर कोसळला आहे.

# भरधाव कारची स्कूल बसला धडक, एक ठार

**जनसंचलन/ नांदुरा**

दोन्ही वाहनांचे नुकसान स्कूल बसला भरधाव कारने समोरून धडक दिली. यामध्ये दोन्ही वाहनांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. लोकमत न्यूज नेटवर्क मोताळा : शैक्षणिक सहलीवरून परतणाऱ्या विद्यार्थ्यांच्या स्कूल बसला भरधाव कारने जोरदार धडक दिली. या मो. मुसब अब्दुल जाबीर अपघातात मृतक बससमोर उभे राहून इंजिनमध्ये पाणी टाकत असलेल्या ३४ वर्षीय युवकाचा जागीच मृत्यू झाला. ही घटना मोताळा-नांदुरा मार्गावरील मोताळा येथील विद्युत सबस्टेशन जवळ २३ डिसेंबरच्या रात्री दीड वाजताच्या सुमारास घडली आहे. मो. मुसब अब्दुल जाबीर असे मृतक युवकाचे नाव आहे. जळगाव जामोद येथे लड्क देशमुख हे खासगी शिकवणी वर्ग चालवितात. रविवारी सकाळी ते काही विद्यार्थ्यांची शैक्षणिक सहल घेऊन छत्रपती संभाजीनगर येथे गेले होते. त्यांनी सोबत मित्र खासगी संस्थेवरील लिपिक मो. मुसब अब्दुल जाबीर यालाही नेले होते. रात्री उशिरा जळगाव जामोदकडे परत येत असताना स्कूल बसचे इंजिन गरम झाले. त्यामुळे मोताळा-नांदुरा रोडवरील विद्युत सबस्टेशनसमोर त्यांनी बस थांबविली. तेव्हा मो. मुसब अब्दुल जाबीर खाली उतरून इंजिन मध्ये पाणी टाकत असताना समोरून भरधाव आलेल्या कारने स्कूल बसला जोरदार धडक दिली. या अपघातात मो. मुसब याला गंभीर दुखापत झाली. त्याला तत्काळ मोताळा ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. परंतु डॉक्टरांनी मृत्यू घोषित केले. याप्रकरणी बोराखेडी पोलिस ठाण्यात कारचालक अखिलेश विजय चौधरी (रा. नांदुरा) याच्याविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अपघातात दोन्ही आहे. वाहनाचे नुकसान झाले

# आठवडी बाजारातून चार महिलांची पर्स लंपास सिंदखेड राजा शहरात भुरट्या चोरट्यांची टोळी सक्रिय !

**जनसंचलन/ सिंदखेडराजा**

शहरातील आठवडी बाजारातून चार ते पाच महिलांची पर्स चोरट्यांनी लंपास केली. यापूर्वीही चोरट्यांनी मोबाइल, रोख रकमेवर डल्ला मारल्याची अनेक उदाहरणे आहेत. बाजाराच्या गर्दीत भुरट्या चोरट्यांची टोळी सक्रिय असल्याचे प्रथमदर्शनी लक्षात येते. शहरात प्रत्येक सोमवारी श्री रामेश्वर मंदिर जवळ आठवडी बाजार भरतो. परिसरातील अनेक खेड्यांतून बाजारासाठी ग्रामस्थ येतात, तर शहरातील महिलाही बाजारात आठवड्याचा भाजीपाला खरेदीसाठी जातात बाजारातील गर्दीचा फायदा घेऊन महिलांजवळील रोख रक्कम असलेले पाकीट, पर्स शिताफीने गायब करणारी टोळी सक्रिय झाली दिसून येत आहे. सोमवार, दि.२३ डिसेंबर रोजी दिवसभरात बाजारातून चार ते पाच महिलांच्या जवळील पर्स लंपास केली. गत काही आठवड्यांपासून चोरीच्या घटनांमध्ये मोठी वाढ झाल्याचे दिसून येत आहे.

## बाजारात चोरी होणे नेहमीचेंच !

**बाजारात चोरी होणे हे नित्याचेच झाले आहे. महिला पोलिसात तक्रार देत नसल्याने पोलिसही या विषयाला गांभीर्याने घेण्यास तयार नाहीत. लाखो रुपये खर्च करून शहरात मुख्य ठिकाणी सीसीटीव्ही लावण्यात आले आहेत. आठवडी बाजार परिसरातही सीसीटीव्ही आहेत, त्याचे फुटेज पाहून पोलिसांनी कारवाई करणे अपेक्षित आहे. मात्र, आता आणि यापूर्वी झालेल्या चोरीचा छडा पोलिसांना लावता आलेला नाही.**



# समर्थ कृषी महाविद्यालयात राष्ट्रीय किसान दिन साजरा....

**जनसंचलन/ देऊळगाव राजा**

स्थानिक समर्थ कृषी महाविद्यालयात २३ डिसेंबर रोजी भारताचे माजी प्रधानमंत्री चौधरी चरण सिंह यांच्या जयंती निमित्त राष्ट्रीय किसान दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. नितीन मेहेत्रे होते. प्रा मोहजितसिंह राजपूत, रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. किरण ठाकरे, प्रा. विलास सातपुते यांनी प्रतिमेचे पूजन करुन अभिवादन केले. माजी प्रधानमंत्री चौधरी चरण सिंह यांचे शेतीसाठी असलेले योगदान व कृषी शिक्षणात त्यांचा असलेला सहभाग याविषयी डॉ. नितीन मेहेत्रे यांनी मार्गदर्शन केले.



उपस्थित मान्यवरांनी कृषिदूत व कृषिकन्यांना शेती व शेतकऱ्यांच्या विकासाच्या दृष्टीने कार्य करण्याचे आवाहन केले. या कार्यक्रमास प्रा. सचिन सोळंकी, प्रा. विजय पवार, प्रा. विकास म्हस्के, प्रा. संदीप टेकाळे, रासेयो स्वयंसेवक, विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित होते

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784 Title Code- MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

# विचारधारा ग्राम शहरी अध्ययन शिबिर


जनसंचलन/बुलढाणा

दिव्य सेव प्रकल्पाच्या वतीने वरखंड गोधनखेड येथे दि. २६ ते ३० डिसेंबरच्या दरम्यान ग्रामीण अध्ययन शिबिर आयोजित करण्यात आले आहे. ग्राम शहरी अध्ययन शिबिरात ग्रामीण वास्तव्य हा मुख्य विषय आहे. त्याचबरोबर, ५ दिवसीय हे निवासी शिबिर असून, सर्व वयोगटांसाठी खुले आहेत. त्यामुळे शिबिरात लाभ घेण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे. आपण समाजाचे काही देणे लागतो, ही जाण ठेवून विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणविता निर्माण व्हावी, याकरिता या शिबिराचे आयोजन केले जाते. यावर्षी शिबिराचे चौथे वर्ष असून, या शिबिरामध्ये संपूर्ण महाराष्ट्रातून ५० विद्यार्थी सहभागी होत आहे. यामध्ये गझल मैफिल, कवी, साहित्य, ज्येष्ठ समाजसेवकांचे व्याख्यान शिबिरात आयोजन पाच दिवस केले आहे. हे शिबिर २९ ते ३० डिसेंबरपर्यंत दिव्य सेवा प्रकल्प येथे होणार आहे. या शिबिराचे उद्घाटन बुलढाणा अर्बनचे अध्यक्ष राधेश्याम चांडक, आमदार संजय गायकवाड, जिल्हा चिकित्सक डॉ. भागवत भुसारी, ॲड. पुरुषोत्तम पडघान नागपूर, उपकार्यकारी अभियंता विवेक वाघ, डॉ. गणेश गायकवाड, डॉ. सौरभ संचेती, डॉ. हरीश साखरे, गजानन जाधव आदींच्या उपस्थितीत होणार

# सिंदखेडराजात तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन

जनसंचलन/ सिंदखेडराजा

येथील महात्मा जोतिबा फुले माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालयामध्ये ५२व्या तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती विज्ञान शिक्षक संघटनेचे तालुकाध्यक्ष दीपक नागरे यांनी दिली आहे. ३०, ३१ डिसेंबर या दोन दिवसांत विविध शाळांचे विद्यार्थी या प्रदर्शनात सहभागी होणार आहेत. दीपक नागरे यांच्या उपस्थितीत नुकतीच प्रदर्शनाची पूर्व नियोजन बैठक घेण्यात आली. गटशिक्षण अधिकारी भास्कर वाघमारे, विषयतज्ज्ञ प्रवीण गवई, दिलीप काकडे यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. तालुक्यातील शाळांमधील ६वी ते ८वी व ९ ते १२वीच्या विज्ञान शिक्षकांनी पुढाकार घेऊन विद्यार्थ्यांना सहभागी करावे तसेच शिक्षकांनी स्वतः शैक्षणिक साहित्य तसेच संकल्पना स्पष्ट करणारी विविध उपकरणे तयार करून प्रदर्शनात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले. प्रदर्शनात सहभागी होणारी उपकरणे लोकोपयोगी होऊ शकतील, असा प्रयत्न झाला पाहिजे, अशा सूचना नागरे यांनी दिल्या. बैठकीतील नावीन्यपूर्ण कल्पनांचे यशस्वितेसाठी तालुक्यातील सर्व विज्ञान शिक्षकांनी सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले. बैठकीला प्राचार्य उद्धव दराडे, सुचिता इठोळे, एम. एस. गीते, श्रीराम भोसले, वैशाली सरोदे, अश्विनी मेहेत्रे, अशोक जायभाये, भानुदास लव्हाळे, श्रीधर जायभाये, एस. टी. तायडे, गैबीनंद घुगे, गजानन काळे, रामदास सानप, सुहास भावसार, संदीप फड, अशोक तायडे, सतीश तिडके यांची उपस्थिती आहे




# गो. से. महाविद्यालयात राष्ट्रीय गणित दिन २०२४ उत्साहात साजरा

जनसंचलन/ खामगाव




थोर भारतीय गणितज्ञ श्रीनिवास रामानुजन यांच्या १३७ वी जयंतीचे औचित्य साधून विदर्भ शिक्षण प्रसारक मंडळ खामगाव द्वारा संचालित गो.से.विज्ञान, कला व वाणिज्य महाविद्यालयातील गणित विभागाच्यावतीने राष्ट्रीय गणित दिवस साजरा करण्यात आला, रामानुजन यांच्या गणितामधील योगदानाचे महत्व विविध स्थरावरील विद्यार्थ्यांपर्यंत पोहचावे या करिता गणित विभागाद्वारे २२ डिसेंबर रोजी विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.त्या अनुषंगाने दि.२२ डिसेंबर रोजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. धनंजय तळवणकर यांच्या कल्पनेतून गणित विभागतर्फे श्रीनिवास रामानुजन यांच्या जीवनावरती प्रकाशझोत टाकणारी राष्ट्रीय स्तरीय ऑनलाईन प्रश्नमंजुषा-२०२४फ्क्ष चे आयोजन करण्यात आले. या प्रश्नमंजुषा-२०२४ मध्ये जवळपास ११० पेक्षा जास्त संस्थांनी सहभाग नोंदवला त्या मध्ये नामांकित एन.आय.टी.,विद्यापीठासह कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील तब्बल १२५५ विद्यार्थ्यांनी प्रश्नमंजुषा दिली हे विशेष! तसेच एम.एस्सी. गणितमधील विद्यार्थ्यांकरिता Use of Python, Latex, Mathematica Software's in Research या विषयावरती एक दिवशीय कार्यशाळाचे आयोजन करण्यात आले होते, करिता मुख्य मार्गदर्शक म्हणून डॉ. किशोर एस.वानखडे ( सहयोगी प्राध्यापक तथा गणित विभाग प्रमुख,यशवंतराव चव्हाण कला व विज्ञान महाविद्यालय मंगरूळपीर जि. वाशीम ) हे होते. आपल्या मुख्य मार्गदर्शनात डॉ. किशोर एस.वानखडे यांनी श्रीनिवास रामानुजन यांच्या गणित विषयातील योगदानावरती प्रकाश टाकला व विद्यार्थ्यांना गणित विषयातील वेगवेगळ्या नावीन्यपूर्ण पद्धती अवगत करून त्या पाठांतर केल्यापेक्षा आत्मसात करण्यावर भर द्यावे असे प्रतिपादन केले. संशोधन ही काळाची गरज आहे, संशोधनात सुरुवात झाल्यावर शोधनिबंध लिहिताना वेगवेगळ्या सॉफ्टवेअर हाताळण्याबद्दल ची माहिती दिली व त्याचे प्रात्यक्षिक विद्यार्थ्यांकडून करून घेतले. सदर कार्यक्रमाचे अध्यक्ष गणित विभागप्रमुख प्रा. सचिन शिंगणे होते त्यांनी गणितदिवसाबद्दल विध्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. पद्माकर कायपेल्लीवार यांनी केले, तर आभार एम.एस्सी. गणित प्रथम वर्ष विध्यार्थिनी रेश्मा धनोकार यांनी मानले. दोन्ही कार्यक्रमः प्रश्नमंजुषा-२०२४ व एक दिवशीय कार्यशाळा यांच्या यशस्वीतेसाठी प्रा.गजानन सरकटे, प्रा. दत्ता काळे,प्रा. मयुरी लोखंडकर, प्रा. पूजा निमकर्डे व प्रा. निकिता धोत्रे यांनी परिश्रम घेतले. सदर कार्यक्रमाला एम.एस्सी. गणित चे विद्यार्थी उपस्थित होते.अशी माहिती एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे प्रसिद्धी प्रमुख प्रा. डॉ. मोहम्मद रागिब देशमुख यांनी दिली आहे.

# जवळा येथे रंगला शंकरपटाचा थरार खेळ...!

## जिल्ह्यासह परजिल्ह्यातील १४२ बैलजोड्यांचा सहभाग

जनसंचलन/मेहकर




तालुक्यातील जवळा येथे शिक्षण क्रांती संघटनेच्या वतीने दि. २१ व २२ डिसेंबर रोजी शंकरपटाचे आयोजन करण्यात आले होते. दोन दिवस रंगलेल्या शंकरपटाच्या थरारामध्ये बुलढाणा जिल्ह्यासह इतर जिल्ह्यातील १४२ जोड्यांनी सहभाग घेतला. या शंकरपटाच्या उद्घाटन सोहळ्याला तहसीलदार नीलेश मडके, डोणगाव पोलिस स्टेशनचे ठाणेदार नागरे, संभाजी ब्रिगेडचे जिल्हा कार्याध्यक्ष पांडुरंग पाटील, संभाजी ब्रिगेड विधानसभा अध्यक्ष विकास तेजनकर पाटील यांची उपस्थिती लाभली. यावेळी मुख्याध्यापक दत्तात्रय रहाटे, हनुमान इंगळे, गावचे सरपंच मदन मोरे, उपसरपंच माधवराव खरात, शिक्षण क्रांती संघटनेचे सर्व पदाधिकारी, समस्त गावकरी, बैलगाडा मालक तसेच प्रेक्षक उपस्थित होते. शिक्षण क्रांती संघटनेच्या पदाधिकाऱ्यांच्या वतीने मान्यवरांचा सत्कार सोहळा पुष्पगुच्छ व ग्रामगीता भेट देऊन पार पाडण्यात आला. हा शंकरपट ड गटातील सर्वात मोठा शंकरपट होता. जवळपास एक लाख रुपयांची जंगी लूट यामध्ये ठेवण्यात आलेली होती. या पटामध्ये अहमदनगर, संभाजीनगर, परभणी, वाशिम अशा अनेक दूरवरच्या जिल्ह्यातून बैलजोड्या दाखल झालेल्या होत्या. या शंकरपटात १४२ बैलजोड्यांनी विक्रमी सहभाग नोंदवला. या शंकरपटातील बक्षीस वितरण समारंभासाठी सुभाषराव कोल्हे, उपमुख्याधिकारी आनंद देवकते यांची उपस्थिती लाभली. या पटातील प्रथम क्रमांकाचे २१ हजार रुपयांचे पारितोषिक जवळा गावातीलच छगन दोडके यांच्या शंभू आणि महाराज या बैल जोडीने पटकाविले.

# चाकरी नव्हे, कौशल्य आत्मसात करून बना स्वतःच मालक...

## न्यु सिटीजन इन्स्टीट्युटने घेतला पुढाकार...

**जनसंचलन/बुलढाणा**

शिक्षणानंतर सरकारी नौकरीच हवी असा हट्ट धरणारे अनेक युवक आपल्या अवतीभोवती दिसतात. मात्र विविध कारणांमुळे आई वडिलांचे स्वप्न पूर्ण करण्याचा त्यांचा हेतू साध्य होत नाही. त्यामुळे ते नैराश्याच्या गर्ते त सापडतात. याच नैराश्यातून कधी कधी टोकाचे पाऊलही उचलतात. शिक्षण घेऊन कुणाची चाकरी करण्यापेक्षा सुशिक्षित युवकांनी विविध प्रकारची कौशल्ये आत्मसात करून स्वतःच मालक बनून कुटूंबाला आधार द्यावा, या हेतूने न्यु सिटीजन इन्स्टीट्युटने पुढाकार घेत दहावी उत्तीर्ण विद्यार्थी, विद्यार्थीनींना एक रूपये शुल्क न भरता कौशल्यपूर्ण शिक्षण आत्मसात करून स्वतःच्या पायावर उभे राहण्याची संधी प्रदान केली आहे. राज्य व केंद्र शासनाची मान्यताप्राप्त आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र व प्रधानमंत्री कौशल्य विकास योजनेतंर्गत दहावी उत्तीर्णांसाठी बुलढाणा येथील भडेच ले-आऊट, मलकापूर रोड येथे आयोजित तीन महिने कालावधीच्या मोफत प्रशिक्षणात इलेक्ट्रीशीयन, ग्राफीक्स डिझायनर, मोबाईल फोन हार्डवेअर रिपेयर टेक्निशीयन, जनरल ड्युटी असिस्टंट नर्सिंग व मॅकेनिकल फिटर इलेक्ट्रानिक्सचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. या प्रशिक्षणातून रोजगार व स्वयंरोजगार सुरू करण्याची संधी प्रशिणार्थीना मिळणार आहे. प्रशिक्षणासाठी उच्च दर्जाची अत्याधुनिक यंत्र सामूग्री, अनुभवी व उच्च शिक्षित शिक्षकांचे




प्रशिक्षणार्थीना मार्गदर्शन मिळणार आहे. तीन महिन्यांचे प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर प्रशिणार्थीना शासनाचे प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. प्रशिक्षणाच्या प्रवेशासाठी शाळा सोडण्याचा दाखला, गुण पत्रिका, आधार कार्ड, दोन पासपोर्ट छायाचित्र, मेल आयडी हे कागदपत्रे लागणार आहेत. या मोफत प्रशिक्षणाचा दहावी उत्तीर्ण विद्यार्थी, विद्यार्थीनींनी लाभ घेण्याचे आवाहन न्यु सिटीजन इन्स्टीट्युटचे संचालक मतीन शेख यांनी केले आहे.

# नायलॉन मांजाने गळा चिरला वृद्ध गंभीर

**जनसंचलन/मोताळा**

चिंचपूरकडे जाणाऱ्या दुचाकीस्वाराचा नायलॉन मांजाने गळा चिरल्याची घटना मोताळा-बुलढाणा रोडवरील उर्दू शाळेजवळ २१ डिसेंबर रोजी घडली. दुचाकीचा वेग कमी असल्याने सुदैवाने त्यांचे प्राण वाचले. अशोक नंदलाल झंवर असे जखमी वृद्धाचे नाव आहे. मोताळा येथील माजी सरपंच अशोक नंदलाल झंवर हे २१ डिसेंबर रोजी दुचाकीवरून शेताकडे निघाले होते. चिंचपूरकडे जात असताना



मोताळा-बुलढाणा रोडवरील लोखंडी पुलाजवळील उर्दू जवाहर हायस्कूलजवळ ते आले असता त्यांच्या गळ्यात नायलॉन मांजा अडकल्याने ते खाली पडले. मांजाने त्यांचा गळा चिरल्याने मोठा रक्तस्त्राव झाला. त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले.

# बुलढाण्यात नाताळ सणासाठी बुलढाणा नगरी सजली...



**जनसंचलन/बुलढाणा**

मानवता धर्माचा उपासक असलेल्या प्रभू येशूचा जन्मदिन अर्थात नाताळ सण २५ डिसेंबर रोजी आहे बुलढाणा शहरात या सणाच्या तयारीला वेग आला आहे. नाताळ सणाचे आनंदाने स्वागत करण्यासाठी बुलढाणा सध्या प्रभू येशूच्या जन्माचे देखावे अर्थात नाताळ गोठे साकारण्याचे पुर्ण झाले आहे. तसेच बुलढाणा येथील चर्च ऑफ दी नॅझरीन येथे आकर्षक विद्युत रोषणाई आणि सजलेले आहे.बुलढाणा शहरात ख्रिस्ती नागरिकांची संख्या मोठी आहे. प्रभू येशूचा जन्म गोठ्यात झाला होता. जन्माचा देखावा आणि त्या काळाची प्रतिकृती म्हणून नाताळ गोठे बनविण्यात येतात. यामध्ये सर्वसाधारणपणे बेथलेम गावाची पार्श्वभूमी, डोंगर, नद्या, गवताळ परिसर तसेच लाकडी गोठा, मध्यभागी बाळ म्हणजेच येशू आणि डोक्यावर रंगवण्यात आलेला तारा, एका बाजूला मेरी तर दुसऱ्या बाजूला जो- सेफ, कोपऱ्यात बसलेली गाय, आपल्या मेंढरांसोबत गोठ्याजवळ उभे असलेले मेंढपाळ आणि भेटवस्तू घेऊन आलेले तीन राजे साकारले जातात. यासोबतच आकर्षक रोषणाई करण्यात येत आहे. रेव्ह सुहास गुर्जर,रेव्ह सुरेश पळसकर,प्रणिल मेहेंद्रे,सतिश खरे,अशुतोष अंकुश,अनिल मेहेंद्रे,अशोक कांबळे,सुशिल मेहेद्रे,राजेश गुर्जर, डॉ सलोमन गुर्जर,अभिजीत गुर्जर तसेच सर्व पंच मंडळ सदस्य यांच्या वतीने शुभेच्छा देण्यात आल्या आहे.

# संतोष देशमुख यांच्या परिवारास आर्थिक मदत व शासकिय नोकरी मिळण्यात यावी या मागणीसाठी पंचायत राज विकास मंचच्या वतीने मुख्यमंत्री यांना निवेदन...



**जनसंचलन/बुलढाणा**

बीड येथील प्रकरणातील सरपंच संतोष देशमुख यांच्या परिवारास आर्थिक मदत व शासकिय नोकरी मिळण्यात यावी या मागणीसाठी पंचायत राज विकास मंच व अखिल भारतीय सरपंच परिषद यांच्या वतीने मुख्यमंत्री यांना निवेदन देउन मागणी करण्यात आली आहे.बीड येथील सरपंच संतोष देशमुख यांचा अमानुषपणे खून झालेला आहे.या प्रकरणातील आरोपींना कठोरात कठोर शिक्षा देण्यात यावी.परंतू आता या भयानक घटनेमुळे देशमुख कुटुंबीय भयभीत असून त्यांच्या कुटुंबाला आणि या खटल्यातील साक्षीदार पुराव्यांना संरक्षण देणे गरजेचे आहे. त्याचप्रमाणे स्व संतोष देशमुख यांच्या परिवाराला शासनाच्या वतीने एक कोटी रूपयांची भरीव आर्थिक मदत करावी आणि त्यांच्या कुटुंबातील एकाला शासकीय नोकरी देण्यात यावी अशी मागणी राज्यातील तमाम सरपंचांच्या वतीने करण्यात आली आहे.ग्रामीण महाराष्ट्र आणि गाव खेड्यामध्ये काम करत असलेले सरपंच व उपसरपंच या घटनेमुळे हादरून गेलेले आहेत त्यामुळे सरपंच संरक्षण कायदा मंजूर करण्यात यावा, ज्या योगे सरपंचांना विकासात अडचण आणणाऱ्यांच्या विरोधात तक्रार देता यावी आणि तक्रार शासकीय कामात अडथळा म्हणून तातडीने नोंदवली जावी अशी तसेच प्रत्येक ग्रामसभेत पोलिस बंदोबस्त देण्यात यावा आणि ग्रामीण भागाचा विकास करून पाहणाऱ्या सरपंच व सहकारी यांना मुक्तपणे काम करण्यासाठी त्यांच्या पाठीशी शासनाने खंबीरपणे उभे राहणे गरजेचे आहे अशी विविध मागण्यासाठी हे निवेदन देण्यात आले आहे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958